# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५६७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/०८/२०१७

**१) मोटार सायकलची चोरी . :-**

दिनांक ०९/०८/२०१७ चे १३.३० वा. दर. यातील फिर्यादी कुमार बाबुल मालाकार वय २८ वर्ष रा. आंबेडकर वार्ड बंगाली कॉलोनी भंडारा यांची टिव्हीएस वेगो पांढऱ्या रंगाची मोटार सायकल क्र. एमएच ३६ एन १२२६ कि. २०,०००/रु ची ही सामान्य रूग्नालय भंडारा चे आवारात लॉक करून ठेवले असता, कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन लॉक खोलुन चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कावळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) ट्रॅक्टरच्या धडकेत एक जखमी. :-**

दिनांक १०/०८/२०१७ चे १७.०० वा. ते १७.१० वा. दर. यातील जखमी फिर्यादी अजय विजयकुमार पालीवार वय २५ वर्ष रा. गरोबा मैदान नागपुर हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच २० सि.डब्लु ३८३७ ने खरबी वरून भंडारा कडे एन ६ रोडने जात असता यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन रॉग साईडने व भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन जखमीचे मोटार सायकलला धडक मारून जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी जखमीचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहनगर येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी ताराम. पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) संगनमत करून भांडण करून काठीने कपाळावर मारून जखमी करून मारण्याची पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक १०/०८/२०१७ चे १९.०० वा. दर. यातील फिर्यादी सुशिलकुमार विजय सिंग वय २८ वर्ष रा. रेल्वे क्वॉर्टर तुमसर हा रेल्वे मध्ये तिकीट परिक्षक असुन १० दिवस अगोदर यातिल आरोपी यांना तुमसर ते तिरोडा रेल्वे गाडी मध्ये बिना तिकीट पकडुन चालान केले या कारणावरून आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादी गाडीत का पकडले म्हणुन भांडण करून शिवीगाळ केली व काठीने कपाळावर मारून जखमी करून मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक १०/०८/२०१७ चे १६.२५ वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच व्ही ६०६५ ही दारू पिवुन दारूचे नशेत बिना लायसन्स चालवीतांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन द्वारे चेक केले असता अल्कोव्होलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. भुरर्ले यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५,(१),३/१८१,१३९ सिएम व्हिआर / १७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भोंगाडे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

५) हार्टअटॅक व ब्रेन हॅमरेज होवुन प्रकुती बिघडुन इसमाचा मृत्यु:—

दिनांक ०९/०८/२०१७ चे ०२.०० वा. दर. यातील मृतक रफीक इस्माईल शेख वय ४८ वर्ष रा. बाळापुर कॅम्प याची बि.पी.चे आजाराने हार्टअटॅक व ब्रेन हॅमरेज झाल्याने प्रकुती खराब होवुन त्यास औषधोपचाराकरीता डोंगरी माईन्स दवाखाण्यात नेवुन पुढील उपचारा करीता सु.बो. दवाखाना तुमसर येथे नेत असता मरण पावल्याने पो.स्टे तुमसर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ.चे कागदपत्र पो.स्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कळंबे पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

६) सर्प द्दंश झाल्याने औषधोपचारा दरम्यान मुलाचा मृत्यु:—

दिनांक ०९/०८/२०१७ चे २०.०० वा. दर. यातील मृतक जितु ओमप्रकाश बुधे वय १८ वर्ष रा. मोहाडी हा दि. ०५/०८/१७ ला आपले घरी झोपले असता याचे पायाच्या अंगठीला सापाने चावा घेतल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रूग्नालय भंडारा येथे आयसीयु मध्ये भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमोवरून पो.स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जा.फौ.चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे पोना. नागदवने पो.स्टे सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ.उईके पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

७) अवैध दारु / जुगार अडयावर धाडी . :—

दिनांक १०/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे गोबरवाही, पवनी, कारधा, सिहोरा व लाखांदुर दारू/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४० लिटर हा.भ. दारू किंमती २४००/—रु. व २ लिटर ७०० मिलीलीटर देशी दारू कि. ७७०/रु तसेच जुगारातुन कि. ५६८ /रु असा एकुन ३,७३८/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ०९/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक ०४, तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८९ केसेस करण्यात आलेल्या आहे.



(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.